ठाणे शहर

वर्तकनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर.
पायोनियर सोसायटी समोर, साईबाबा मंदिर रोड, पोखरण रोड नं.०१, ठाणे (प) ४००६०६, दुरध्वनी क्रमांक ०२२ - २५८५३५७६
e-mail . cp.thane.vartaknagar@mahapolice.gov.in

जावक क्रमांक/ /२०२६, दिनांक :— २७/०७/२०२६

वर्तक नगर पोलीस स्टेशनची उल्लेखनीय कामगीरी

घरफोडीतील सराईत गुन्हेगाराचा २१० हुन अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून व तांत्रीक विश्लेषनाच्या आधारे शोध घेवनु अटक केली व आरोपीकडुन चोरीचे सोने चांदीचे दागीने व गुन्ह्यात वापरलेले वाहने असा एकुन ११,६५,९०० रु किमतीचा मुद्देमाल जप्त.

वर्तकनगर पोलीस स्टेशन हद्दीतील अष्टविनायक सोसायटी, राजे शिवाजी शाळेजवळ, लोकमान्य नगर, पाडा नं. ४, ठाणे येथे दिनांक २५/०६/२०२६ रोजी एक अज्ञात चोरट्याने घराचे लॉक तोडुन लोखंडी कपाटातील सोने चांदीचे दागीने चोरी केलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वर्तकनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं । ४८०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३३१(३),३०५(ब),२४९, ६१, ३(५) प्रमाणे गुन्हा नोंद होताच तात्काळ वरीष्ठांनी पोउपनि/मेघराज जाधव व तपास पथक यांना सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून गुन्ह्याची उकल करण्याच्या सुचना दिल्या असता तात्काळ तपास पथकाने घटनास्थळी जावुन आजुबाजुला राहण्या-या नागरीकांकडे चौकशी केली व सीसीटीव्ही फुटेज पाहणी सुरु केली असता एक संशयीत इसमाचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. त्यानंतर सदर संशयीत इसमाचा जाण्याच्या मार्गावरील परिसरातील सीसीटीव्ही तपासत असताना संशयीत इसम हा घटनास्थळापासुन काही अंतरावर नंबर प्लेट नसलेली, लपवुन ठेवलेल्या बाईकवरून जाताना दिसला. त्याअनुषंगाने ६ दिवस व रात्र असे सातत्याने २१० हुन अधिक सीसीटीव्ही कॅमेरे तपासुन आरोपीचे नाव व पत्ता निष्पन्न केले. सदर आरोपी हा अस्थीत्व लपवत असल्याने त्याचा सलग १५ दिवस गोपनीय बातमीदारामार्फत ठावठिकाणाबाबत माहिती प्राप्त करून यशस्वी सापळा रचुन तपास पथकाने आरोपी नामे आकाश उर्फ चिन्या शशिकांत जाधव, वय २६ वर्षे, राह. शिवाजीनगर, मानपाडा, ठाणे पश्चिम यास धंर्माचा पाडा, बम्हांड,ठाणे पश्चिम या ठिकाणी येथे दुचाकीवर पळुन जाताना दिनांक १६/०७/२०२६ रोजी २३.४५ वा पाठलाग करून शिताफीने पकडले. तसेच आरोपी क्र २ नामे चेतन हनुमंत कांबळे, राह. कोळशेत रोड, आझादनगर, ठाणे पश्चिम हा त्याचे अस्थीत्व लपवुन होता. त्याची गोपनीय बातमीदार व तांत्रीक विश्लेषनाच्या आधारे माहिती काढुन त्यास दिनांक २१/७/२०२६ रोजी ठाणे येथुन पळुन जाताना तुर्भे,नवी मुंबई येथे मुबई पुणे हायवेवर पाठलाग करून अटक केली. आरोपी क्र १ आकाश उर्फ चिन्या जाधव याचेकडे तपासादरम्यान माहिती मिळाली की,सदर आरोपी हा दिवसा घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार असुन यापुर्वी त्याच्यावर साधारण घरफोडीचे १० ते १२ गुन्हे दाखल आहे. सदर आरोपीत याने वर्तकनगर पो स्टे हद्दुदीत लोकमान्य नगर येथे २०२५ मध्येही एक घरफोडी केल्याची कबुली दिली असुन नमुद दोन्ही अटक आरोपी यांचेकडुन **सोने चांदीचे** दागीने आणि गुन्ह्यात वापरलेल्या २ दुचाकी व एक Hundai कंपनीची Aura कार असा **एकुन ११,६५,९००/- रु** किमतीचा मुद्देमाल जप्त केला व घरफोडीचे **दोन** गंभीर गुन्हे उघड करून उल्लेखनिय कामगीरी केलेली आहे.

सदर उल्लेखनिय कामगिरी पोलीस उप आयुक्त परि-५ श्री. प्रशांत कदम यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस आयुक्त वर्तकनगर विभाग सौ ममता डिसोजा यांचे सुचनेप्रमाणे वर्तकनगर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रविण माने, पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री. विठ्ठल चौघुले, पो.नि. (गुन्हे) श्री. मल्हारी कोकरे, तपास पथकाचे पोउपननि/ मेघराज जाधव, पो. हवा./ ३२१४ दिपक जाधव, पोहवा/६६७५ श्रीमंत राठोड, पोना/७०५० गणेश पाटोळे, पोशि/ २२१० प्रदिप सुरवसे, पोशि/८१३४ नानासाहेब नागरे, पोशि/५३८४ शिव कात्राबाद तसेच (तांत्रीक मदत) पोहवा/ ६६५२ रविंद्र रावते. (प्रतिनियुक्ती- मा.पो.उप.आ.परि.५.वा.ई.ठाणे यांचे कार्यालय.) यांनी केली आहे.

---ooo---